स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वाणिज्य शाखेतील विद्या वाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी करावयाच्या

संशोधन प्रबंधाची रुपरेषा.

"पारंपारिक गुंतवणूक व म्युचअल फंड गुंतवणूक यामधील पुणे जिल्हयातील

गुंतवणूकदारांचा तुलनात्मक अभ्यास (२०११–२०२१)".

संशोधक

कांचन सचिन खिरे.

(एम.कॉम, नेट,जी.डी.सी अॅण्ड ए)

संशोधन केंद्र

दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर.

मार्गदर्शक

प्रा.डॉ. ब्रिजमोहन दायमा.

(एम.कॉम, सेट,नेट,जी.डी.सी अॅण्ड ए, पीएच.डी),

विभाग प्रमुख, व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग व प्राध्यापक,

दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर.

मार्च २०२२.

१) प्रस्तावना :

म्युचअल फंड हा एक गुंतवणूकीचा पर्याय असून, गुंतवणूकदार करबचत,संपत्ती निर्माण करणे अथवा नियमित उत्पन्न मिळवणे इ. उद्‌दिष्टये साध्य करण्याच्या उद्‌देशाने यामध्ये गुंतवणूक करतात.

भारतीय भांडवल बाजारात अनेक मालमत्ता व्यवस्थापन कंपन्या आपापले म्युचअल फंड चालवत आहेत. सामान्य माणसाला भांडवल बाजार तसेच शेअर गुंतवणूकीमध्ये स्वारस्य नसते. मात्र अशा सामान्य गुंतवणूक धारकांसाठी म्युचअल फंड मधील गुंतवणूक हा उत्तम पर्याय उपलब्ध आहे. मात्र म्युचअल फंड मधील गुंतवणूक हा पर्याय शहरी भागातील नागरिकच मोठया प्रमाणावर वापरताना दिसतात. ग्रामीण भागातील नागरिक खरच म्युचअल फंड गुंतवणूकीबाबत जागरुक आहेत का व ते यामध्ये गुंतवणूक करण्याबाबत उत्सुक आहेत का? हा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्हयातील ग्रामीण भागाची निवड केली आहे.

साधारणपणे ग्रामीण भागातील जे गुंतवणूकदार आहेत ते अजुनही सुरक्षित गुंतवणूकीला उदा. विमा, सोने, जमीन, गर्व्हनमेन्ट बॉन्डस् इ.मध्ये गुंतवणूक करण्यास प्राधान्य देतात. मात्र कालपरत्वे ग्रामीण भागातील गुंतवणूकदारांचा गुंतवणूकीच्या संदर्भातील प्राधान्यक्रम बदलला आहे का व ते म्युचअल फंड मध्ये गुंतवणूक करतात का हेच अभ्यासणे हा या संशोधनाचा हेतू आहे.

२) विषयाचे महत्व :

महाराष्ट्रातील अजुनही मोठया प्रमाणात लोक खेडेगावात राहत आहेत तसेच पारंपारिक व्यवसाय करण्यास प्राधान्य देत आहेत. त्यामुळेच अजुनही पारंपारिक किंवा खात्रीशिर गुंतवणूक करण्यास प्राधान्य देतात. मात्र सध्या बदलणारे आर्थिक वातावरण, बॅकांवर लागणारे निर्बंध, त्यामधुन होणारे आर्थिक नुकसान यासर्वांचा विचार करता आताची पिढी नवीन गुंतवणूक पद्‌धतींचा स्वीकार करताना दिसत आहेत. त्यामुळेच म्युचअल फंड कंपनी कुठेतरी प्रगतीपथावर जाताना दिसत आहेत व आपला व्यवसाय करीत आहेत.

३) संशोधनाची कार्यकक्षा :

पुणे जिल्हयामध्ये एकूण १४ तालुके असून पुणे जिल्हयाची एकूण लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ९४,२९,४०८ इतकी आहे. पैकी १५ ते ५९ या वयोगटातील लोकसंख्या ही ५,८९,२८० इतकी असुन प्रत्येक १००० पुरुषांमागे ९१९ महिला आहेत. या वयोगटातील लोक हे प्रामुख्याने व्यवसाय, व्यापार व इतर अर्थाजनाच्या साधनांचा वापर करुन प्रामुख्याने उत्पन्न मिळवित आहेत. या उत्पन्नधारकांच्या गुंतवणूक विषयक काय संकल्पना आहेत अथवा ते गुंतवणूक करीत असताना पारंपारिक गुंतवणूक पर्याय निवड करतात की म्युचअल फंड सारख्या गुंतवणूकीमध्ये गुंतवणूक करणे पसंत करतात हे जाणुन घेण्यासाठी प्रस्तुत विषय मी संशोधनासाठी निवडला आहे.

(सदर्भ – विकीपिडिया, गुगल,माझी मराठी.कॉम)

भारतामध्ये काम करणाऱ्या म्युचअल फंड कंपन्यांची यादी खालीलप्रमाणे–

अ.क्र	कंपनीचे नाव
१	Axis Asset Management Company
२	Aditya Birla Sunlife Asset Mgt. Company
३	Baroda Asset Mgt. Company
४	B.N.P. Paribas Asset Mgt. Company
५	BOI AXA Investment Managers Pvt. Ltd
६	Canara Roboco Investment Managers Pvt. Ltd
७	DHFL Pramerica Asset Managers Pvt. Ltd
८	DSP Invest Asset Managers Pvt. Ltd
९	Edelweiss Asset Management Limited.
१०	S.L. Finance Management Limited.
११	Franklin Templeton Management Ltd.
१२	HDFC Asset Management Co. Ltd
१३	HSBC Asset Management Co. Ltd
१४	ICICI Prudential Asset Management Co. Ltd
१५	IDBI Asset Management Co. Ltd
१६	IDFC Asset Management Co. Ltd

१७	IIFCL Asset Management Co. Ltd
१८	IIFL Asset Management Co. Ltd
१९	IF & FL Infra Asset Management Ltd
२०	India Bulls Assets Management Ltd

या व्यतिरिक्त अजून १९ कंपन्या या क्षेत्रात काम करताना बघायला मिळत आहेत.

(संदर्भ – गुगल. कॉम)

<u>**पारंपारीक गुंतवणुकीचे स्त्रोत**</u>

१. बॅंकांमधील ठेवी

अ) बचत ठेवी

ब) आवर्त ठेवी

क) मुदत ठेवी

२. सोन्यामधील गुंतवणुक

३. जमीन

४. विमा

५. सहकारी संस्था किंवा क्रेडिट सोसायटीमधील गुंतवणूक

६. घरामधील गुंतवणूक

७. सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधी मधील गुंतवणूक

८. वाहानांमधील गुंतवणूक

९. पुरातन वस्तूंमधील गुंतवणूक

(संदर्भ – गुगल. कॉम, फिन कॅश.कॉम)

४) समस्या सुत्रण :

आतापर्यत झालेल्या अभ्यासांवरुन असे जाणवते की अजुनही लोक पारंपारिक गुंतवणूक करण्यास प्राधान्य देतात मात्र सध्याच्या या बदलत्या आर्थिक वातावरणामध्ये पुणे जिल्हयातील लोकांचा गुंतवणुकीचा कल बदलला आहे का ते तपासण्यासाठी मी पुणे जिल्हयातील १४ तालुक्यातील गुंतवणुकदारांची निवड प्रस्तुत संशोधनासाठी केली आहे.

५) संशोधनाची उद्‌दिष्टये :

१. भारतामधील म्युचअल फंड कंपन्यांच्या प्रगतीचा अभ्यास करणे.
२. म्युचअल फंडमधील विविध गुंतवणूक पर्यायांचा व त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
३. गुंतवणूकदारांच्या गुंतवणूकीचा म्युचअल फंड मधील गुंतवणूकीच्या संदर्भातील कल तपासणे.
४. गुंतवणूकदारांचा पारंपारिक गुंतवणूकीमध्ये असणारा कल अभ्यासणे.
५. गुंतवणूकदारांच्या दृष्टीकोनातून म्युचअल फंडातील भविष्यकालीन गुंतवणूकीचा ओघ/कल अभ्यासणे.

६) गृहितके :

१. गुंतवणूकदार गुंतवणूकीच्या संदर्भात जागरुक झाले आहेत.
२. गुंतवणूकदार पारंपारिक गुंतवणूकीसोबतच म्युचअल फंड गुंतवणूकीचा पर्याय स्वीकारत आहे.
३. सहकारी संस्था/पतसंस्था यांच्या अपयशामधून गुंतवणूकदारांचा गुंतवणूक पर्याय बदलताना दिसत आहे.
४. गुंतवणूकदारांना गुंतवणूकीबाबत सुरक्षितता व चांगला परतावा अपेक्षित आहे.
५. पुर्वीच्या तुलनेत गुंतवणूकदारांच्या उत्पन्न पातळीमध्ये वाढ झाली आहे.
६. तरुण गुंतवणूक मोठया प्रमाणात म्युचअल फंडमध्ये गुंतवणूक करणे पसंत करतात.

७) नमुना निवड :

संशोधनासाठी पुणे जिल्हयातील १४ तालुक्यातील १५ ते ५९ वयोगटातील सरकारी कार्यालयामध्ये काम करणाऱ्या, निमसरकारी कार्यालयामध्ये काम करणाऱ्या तसेच खाजगी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या विविध पदांवर कार्यरत असणाऱ्या व लघु, मध्यम व मोठया आकाराचा व्यवसाय करणाऱ्या ३०० ते ४०० लोकांची निवड करण्यात येणार आहे. ही निवड

संशोधनांच्या विविध पद्धती जसे प्रायोगिक संशोधन, यादृच्छिकरण, चाचणी परीक्षण, आवृत्ती तसेच वर्णनात्मक संशोधन पद्धतींचा वापर करण्यात येणार आहे.

८) संशोधन पद्धती :

१. माहिती संकलन –

माहिती संकलन करण्यासाठी माहिती संकलनाचा पुढील पद्धतीचा वापर करण्याचा विचार आहे.

अ) **प्राथमिक माहिती** – प्राथमिक माहिती संकलीत करण्यासाठी पुणे जिल्हयामधील असणाऱ्या ग्रामीण भागातील लोकांच्या मुलाखती घेवुन व प्रश्नावली या दोन पद्धतींचा वापर करण्याचा उद्देश आहे.

ब) **दुय्यम माहिती** – वेगवेगळया माहिती पुस्तिका, संदर्भ ग्रंथ किंवा वेबसाईटस्‌चा, लेख, अभिलेख, वर्तमानपत्रे, मासिके, विशिष्ठ वृत्त, सांख्यिकीय प्रकाशने इ.चा वापर करुन दुय्यम माहिती गोळा करण्याचा उद्देश आहे.

२. माहितीवरील प्रक्रिया –

विविध संख्याशास्त्रीय पद्धतींचा वापर करुन माहितीवर प्रक्रिया केली जाईल जसे –

१. टक्केवारी
२. रेशो ॲनालिसीस
३. स्टॅण्डर्ड डेव्हिएशन व गणितीय सरासरीचा वापर प्रश्नावलीच्या निष्कर्षासाठी.
४. रिॲबीलिटी टेस्टिंग
५. रिलेटिव्ह वेट
६. फॅक्टोरियल ॲनालिसीस

९) प्रकरणात्मक रचना :

संशोधन प्रबंधाचे प्रकरणात्मक मांडणी पुढीलप्रमाणे –

१. भारतातील म्युचअल फंड उद्योग.

२. संशोधन पद्धती व संशोधन साहित्याचा मागोवा.

३. पारंपारीक व म्युचअल फंड गुंतवणूकीतील योगदान.

४. माहिती विश्लेषण.

५. निष्कर्ष व शिफारसी.

डॉ. ब्रिजमोहन दायमा,
संशोधक मार्गदर्शक,
दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर.

सौ. कांचन सचिन खिरे
संशोधक विद्यार्थी.